मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 07 डिसेंबर 2025 | पान- 1

# दूरदृष्टी, उच्चशिक्षित अन् सकारात्मक बद्दल घडवू शकणाऱ्या आश्वासक उमेदवार : कविता भोंगाळे

**विकसनशील प्रभाग : 05**

पिंपरी | प्रतिनीधी : उच्च शिक्षण, व्यवसायातील यश त्याचबरोबर समाजकार्याची उत्कट तळमळ सौ.कविता भोंगाळे यांच्यात पहायला मिळते. ज्यांचे बालपणच व्यावसायिक आणि सामाजिक कार्याचे वातावरण अनुभवत गेले, त्यांना समाजकार्याची दीक्षा घरातच मिळाली. वडिलांनी (श्री.विनायक भोंगाळे) यांच्याकडून समाजकार्याची प्रेरणा घेऊन सामाजिक बांधिलकीची मुहूर्तमेढ रोवली. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात परिपूर्ण कामगिरी केल्यानंतर राजकारणातही चोखपणे जबाबदारी त्या पार पाडत आहेत. महापालिका सभागृहात संधी मिळाल्यास जनसेवा अन् विकास हाच आपला उद्देश राहील, असेही त्यांनी सांगितले.




## समाजसेवेचा व्यापक आवाका

कविताताईंचे कार्य समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले आहे. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या पेन्शन योजनांबाबत मार्गदर्शन आणि उपाययोजना सुचवल्या. नेत्र तपासणी शिबिरे, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आणि खास करून 'लाडकी बहीण' योजनेसारख्या उपक्रमांद्वारे त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी भावनिक जोड साधली.



## विकासाची आधुनिक दृष्टी आणि भविष्याची योजना

आज प्रभागात अनेक जुन्या वसाहती आहेत, जिथे रस्ते, वीज, पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापनासारखे मूलभूत प्रश्न अजूनही भेडसावत आहेत. या प्रश्नांवर ठोस, आधुनिक आणि विकासात्मक उपाय करणे हे त्यांच्या कामाचे प्रमुख स्वरूप असेल. नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करत सोलार प्रकल्पांसारखे अभिनव उपक्रम राबवण्याचा त्यांचा मानस आहे.

" प्रभागाचा केवळ विकासच नाही, तर त्याची सुनियोजित रचनाबद्धता आणि सौंदर्य वाढवणे हे त्यांचे ध्येय आहे. सुशोभीकरण, म्युरल्स (चित्रांकन) अशा उपक्रमांद्वारे प्रभागाला एक नवा, आकर्षक दर्जा प्राप्त करून देण्याचे त्यांचे स्वप्न आहे. आज प्रभागाला केवळ मूलभूत प्रश्न सोडवणाऱ्या नेत्याची नाही, तर उच्चशिक्षित, अनुभवी आणि निर्णय स्वातंत्र्य असणाऱ्या, दूरदृष्टीच्या नेत्याची गरज आहे. कविता भोंगाळे यांच्या रूपाने, नागरिकांना केवळ मूलभूत प्रश्न सुटतील असा नाही, तर प्रभागाचा संपूर्ण कायापालट होईल, असा विश्वास आहे. या संधीचा उपयोग करून प्रभागाच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी, कविता भोंगाळे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी या बदलासाठी साथ द्यावी!





# सकारात्मक बदल घडवू शकणाऱ्या आश्वासक उमेदवार : भोंगाळे

## उच्च शिक्षणाचा आधार आणि विकासाची ताकद




स्वतः सिव्हिल इंजिनिअर असलेल्या कविताताईंमध्ये विकासात्मक बदल घडवून आणण्याची आणि धोरणात्मक विषय प्रभावीपणे मांडण्याची नैसर्गिक क्षमता आहे. त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक अनुभवामुळे, प्रभागाच्या मूलभूत प्रश्नांना आधुनिक आणि सुनियोजित विकासाचे रूप देण्याची ताकद त्यांच्या कामातून दिसेल. बांधकामे आणि विकासकामांमध्ये असलेला त्यांचा अनुभव, प्रभागाच्या कायापालटासाठी अत्यंत मोलाचा ठरणार आहे.

शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची भव्य परंपरा समाजासाठी काहीतरी करण्याची तीव्र इच्छा बाळगून त्यांनी कार्याला सुरुवात केली. आज शैक्षणिक क्षेत्रात त्यांची भरीव कामगिरी आहे; त्यांच्या चार शाळांच्या माध्यमातून त्या उच्च दर्जाचे शिक्षण देऊन एका प्रगतशील पिढीला घडवण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न करत आहेत. त्यांच्या या अतुलनीय सामाजिक कार्याची दखल घेऊनच आमदार महेश दादा लांडगे यांनी त्यांना राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्याची संधी दिली. त्यांना महिला मोर्चा सरचिटणीस पदाची जबाबदारी सोपवली. त्यांनी ती जबाबदारी सहजतेने पेलली आणि 'गायत्री सखी मंच' च्या माध्यमातून महिलांच्या अनेक अडचणी सोडवल्या. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू केली, महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणावर विशेष भर दिला. आर्थिक दृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी विशेष उपक्रम राबवून त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बाल जत्रांसारख्या कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण केला.






